**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक**
नविन प्रशासकिय इमारत, महात्मा नगर, ए.बी.बी.सर्कल, त्र्यंबक रोड, नाशिक
दूरध्वनी क्र. 0253-2591010, e-mail : gadzpnsk@gmail.com
जिल्हा परिषद, नाशिक

---

**"अनुकंपा प्रारुप प्रतिक्षासूचीनुसार कागदपत्र पडताळणी बाबत"** क्र.जिपना/ साप्रवि/आस्था 6/282/26,
दि. 17 सप्टेबर 2026

प्रति,

1) **खाते प्रमुख, (सर्व)**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

2) **गट विकास अधिकारी (उ.श्रे.)**
**पंचायत समिती ------ (सर्व)**

**विषय** :- दिवंगत कर्मचारी यांचे पात्र वारसदार यांची अनुकंपा प्रारुप प्रतिक्षासूची नुसार कागदपत्र पडताळणी करणेबाबत...

**संदर्भ** :- 1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. क्र.अकंपा - 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ.,दि. 17.07.2025.
2. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, , मंत्रालय, मुंबई. क्र.अकंपा - 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ.,दि. 31.07.2025.
3. या कार्यालयाकडील पत्र क्र. जिपना/साप्रवि/आस्था-6/262/26, दि. 04.09.2026.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेतील गट क व गट ड मधील सेवेत असताना दिवंगत झालेले कर्मचारी यांचे पात्र वारसदार यांना अनुकंपा तत्वावर जिल्हा परिषद सेवेत सामावून घेणेबाबतचे सुधारीत तरतुदी प्राप्त झाल्या आहेत.

02. शासन निर्णय दि. 17.07.2025 व दि.31.07.2025 मधील मुद्या क्र. VI परिशिष्ट "इ" नुसार कार्यालयाकडील जे प्रस्ताव परिपुर्ण झाले असुन त्यांना प्रतिक्षासुचीत सामावुन घेण्यास मान्यता दिलेली आहे. अशा सर्व प्रस्तावांची जेष्ठतेनुसार अनुकंपा प्रारुप प्रतिक्षासूची संदर्भ क्र. 03 चे पत्रानुसार प्रसिध्द करण्यात आली आहे. यादीतील संबंधीत उमेदवार यांचे जेष्ठता क्रमांकाबाबत तसेच प्रतिक्षासूचीतील त्यांचे नावासमोरील तपशिलाबाबतच्या माहीतीची पडताळणी उमेदवाराच्या सर्व मुळ कागदपत्रांनुसार करावयांची आहे.

03. त्यामुळे या पत्रानुसार आपणास सुचित करण्यात येते की, प्रारूप प्रतिक्षा यादीतील जे उमेदवार आपल्या विभागातील / तालुक्यातील आहेत त्यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत कागदपत्र पडताळणीकरीता बहुद्देशीय सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद, नाशिक येथे दि. 21 .09.2026 रोजी सकाळी 10.00 वाजता त्यांची सर्व मुळ कागदपत्रे व दोन प्रतीत कागदपत्राच्या छायांकीत प्रत घेवुन उपस्थित रहाणेबाबत आपल्या स्तरावरुन लेखी किंवा दुरध्वनीवरून सुचना देण्यात येऊन समवेत जोडलेल्या प्रपत्रात आपल्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट- क किंवा गट-ड संवर्गात नियुक्तीसाठी पसंतीक्रम प्रपत्राचा नमुना माहिती भरून उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे. उमेदवारास सुचना मिळाली नाही म्हणुन त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी झाली नाही या कारणास्तव उद्धभवणाऱ्या सर्व परिणामास संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख / तालुक्याचे गटविकास अधिकारी (उ.श्रे.) यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सहपत्र:- विकल्पाचा नमुना

**ओमकार पवार** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नाशिक**

प्रत: 1. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांना माहीतीस्तव सादर.
3. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे वैयक्तीक कार्यालय यांना अग्रेषित.
4. जिल्हा प्रकल्प प्रमुख, (आय टी सेल ) नाशिक.
2/- सदर पत्र व अनुकंपा प्रतिक्षासूची जि.प.नाशिकच्या www.zpnashik.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही करणेत यावी.

Scanned with OKEN Scanner

# अनुकंपा नियुक्ती गट बदल बाबत प्रपत्र नमुना

दि.  .09.2026

प्रति

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

विषयः अनुकंपा नियुक्तीसाठी गट क किंवा गट ड संवर्गात पसंतीक्रम देणे बाबत.

अर्जदार: श्री / श्रीमती : -------------------------------------------------------- रा.------------

ता.---------------------------------- जिल्हा ---------------------------

महोदय,

के. श्री. ---------------------------------------------------------- पदनाम --------------- यांचे जि.प. सेवेत असतांना दि.  /  /  रोजी निधन झाले असुन आमच्या कुटुंबास शासनाच्या अनुकंपा नियुक्ती योजनेची माहिती देण्यांत आलेली आहे. त्यानुसार आमचे कुटुंब हे अनुकंपा नियुक्तीसाठी इच्छुक आहे.

माझे नांव अनुकंपा क च्या प्रतिक्षा सुचिमध्ये समाविष्ट असून माझा अनुकंपा प्रतिक्षासुची क्रमांक------------- आहे. तसेच माझे शिक्षण पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| 1. | |
| 2. | |
| 3. | |
| 4. | |
| 5. | |

6. मराठी टंकलेखन आहे/नाही
7. इंग्रजी टंकलेखन आहे/नाही
8. संगणक अर्हता प्रमाणपत्र आहे/नाही
9. यापुवी परिचर पदावर नियुक्ती दिली असल्यास आदेशाचा दिनांक -

1) माझ्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी मी खाली नमुद गटाची निवड करीत आहे.

किंवा

माझ्या शैक्षणिक अर्हता गट-क साठीची असूनही मी स्वखुशीने गट बदल करुन खालील नमुद गटाची निवड करीत आहे.

| पसंतीक्रम | गट - |
|---|---|

(स्वहस्ताक्षरात नमुद करावे (क किंवा ड))

उपरोक्त पसंतीक्रम गट नुसार अनुकंपा प्रतिक्षा सुचीत माझे नांव समाविष्ट करावे ही विनंती.

**शासन निर्णय दिनांक 17 जुलै, 2025 मधील तरतुदीनुसार**

1. सदर गट बदल विनंती ही फक्त एकदाच करता येईल व गट बदलाचा अर्ज जि.प.ला प्राप्त झाल्याच्या दिनांकास माझे नांव गट-ड च्या यादीत समाविष्ट करण्यांत येईल याची मला जाणीव आहे.
2. गट बदलण्याची कार्यवाही केल्यानंतर पुन्हा मुळ गटात समाविष्ठ करुन अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होणार नाही याचीही मला जाणीव आहे.
3. **गट क मधून गट-ड बदल केल्यामुळे गट ड च्या पदावर एकदा अनुकंपा नियुक्ती दिल्यावर भविष्यात शैक्षणीक अर्हतेनुसार अनुकंपाच्या रिक्त होणा-या गट- क पदावर वर्ग केले जाणार नाही हे मला मान्य असुन याबाबत मी भविष्यात ककोणःतीही तक्रार करणार नाही.**

**आपला नम्र**

स्वाक्षरी -

संपर्ण नांव- --------------------------------

पत्ता:----------------------------------------

मोबाईल क्रमांक :

Scanned with OKEN Scanner